सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

१९ जानेवारी १९९०

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज व सन्माननीय सदस्य,

राज्य विधानमंडळाच्या, १९९० मधील या पहिल्या आणि अल्पकालीन अधिवेशनात आपले स्वागत करताना मला आनंद होत आहे. १९८९ हे राज्याच्या सर्वंकष व लक्षणीय विकासाचे आणखी एक वर्ष आहे.

२. शासनाच्या आणि महाराष्ट्रातील जनतेच्या अविरत प्रयत्नांमुळे सातव्या पंचवार्षिक योजनेचे १०,५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे लक्ष्य ओलांडले जाईल अशी अपेक्षा आहे. योजनेच्या पहिल्या तीन वर्षांमध्ये टंचाईसदृश भीषण परिस्थिती असूनसुद्धा, प्रादेशिक असमतोल दूर करणे आणि आदिवासी क्षेत्राचा विकास करणे या गोष्टींवर भर देऊन विकासाचा वेग कायम राखण्यात आला आहे. वीस कलमी कार्यक्रमाचा भाग म्हणून दारिद्र्यरेषेखालील १२ लाख कुटुंबांना विविध स्वयंरोजगार कार्यक्रमांखाली सहाय्य देण्यात आले आहे.

३. आठव्या पंचवार्षिक योजनेसंबंधात धोरणात्मक रूपरेषा निश्चित करण्यासाठी सविस्तर व सखोल विचार चालू आहे. आमचे उपक्रम आणि आमचे अग्रक्रम यांचे प्रतिबिंब १९९०–९१ च्या वार्षिक योजनेच्या मसुद्यात दिसेलच. या मसुद्यास आठव्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग म्हणून नियोजन आयोगाशी विचारविनिमय करून अंतिम स्वरूप देण्यात येत आहे.

४. धुळे जिल्ह्यातील धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यांच्या अतिशय दुर्गम व मागास आदिवासी भागात रस्ते, पिण्याचे पाणी, पोषण आहार यांसारख्या मूलभत सोयी आणि आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विकासाचा एक कालबद्ध स्वरूपाचा "विशेष कृति कार्यक्रम" हाती घेण्यात आलेला आहे.

५. पिण्याच्या पाण्यासाठी विंधण विहिरी उपलब्ध करून देण्याकरिता असलेली किमान लोकसंख्येची मर्यादा १०० ऐवजी ८० करण्याचा निर्णय माझ्या शासनाने घेतला आहे. तसेच, सध्या जेथे पिण्याच्या पाण्याची समस्या आहे अशा आणखी १,३०० गावांना आणि २,५७० वाड्यांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी उपाययोजना करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे.

६. खेड्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने आणि रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करण्यासाठी व त्यामध्ये स्थानिक जनतेला सहभागी करून घेण्याकरता शासनाने यावर्षी "श्रमशक्ती-द्वारे ग्रामविकास" हा एक नवा कार्यक्रम सुरू केला आहे.

७. "इ. स. २००० पर्यंत सर्वांसाठी आरोग्य" हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता शासनाने या वर्षात आणखी १३१ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १७ ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्याचे ठरवले आहे.

८. राज्यात १९८८–८९ या वर्षात अन्नधान्याचे ११०.७६ लाख मेट्रिक टन व तेलबियांचे १७.०३ लाख मेट्रिक टन इतके विक्रमी उत्पादन झाले. या वर्षात यापेक्षाही अधिक उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे.

९. जुलै १९८९ मध्ये राज्याला अतिवृष्टी, महापूर आणि वादळी वारे यांसारख्या अभूतपूर्व नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले व त्यामुळे जीवित व मालमत्ता यांची प्रचंड हानी झाली. राज्य शासनाने तातडीने बचावाची व सहाय्य देण्याची कामे सुरू केली व विस्कळीत झालेल्या अत्यावश्यक सेवा व इतर महत्त्वाच्या सुविधा पूर्वस्थितीत आणण्याची कामेही सुरू केली. वित्तीय सहाय्य देण्यासंबंधातील सध्याची मानके शिथिल करण्यात आली. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि फलोत्पादकांना माझ्या शासनाने वित्तीय सहाय्य दिले आहे व हानी पोहोचलेल्या जमिनी पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे. तसेच, नुकसान पोहोचलेल्या घरांच्या दुरुस्तीसाठी व अधिक सुरक्षित ठिकाणी नवीन घरे बांधण्यासाठीही वित्तीय सहाय्य देण्यात येत आहे.

१०. आपणांस विदित आहेच की, माझ्या शासनाने गेल्या दीड वर्षात शेतकऱ्यांकडे असलेली २३६ कोटी रुपयांची विविध कर्जे माफ केली आहेत. माझ्या शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, त्यांच्याकडून येणे असलेल्या भू-विकास कर्जाची आणखी ४० कोटी रुपये इतकी रक्कम माफ करण्यात यावी. विदर्भातील संत्री उत्पादकांना पूर्वी देण्यात आलेली सुमारे १६.५ कोटी रुपयांची पीक संरक्षण कर्जेसुद्धा माफ करण्यात आली आहेत.

११. मला सांगण्यास आनंद होतो की, वरील धोरणानुसार नव्या केंद्र सरकारने लहान शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, कारागीर व विणकरांची १०,००० रुपयांपर्यंतची सर्व थकित कर्जे माफ करण्याचे धोरण जाहीर केले आहे. या सर्व रकमा केंद्र सरकारने सहकारी, राष्ट्रीयीकृत व व्यापारी बँकांमध्ये तातडीने भरल्यास उत्पादनवाढीस त्याची फार मोठी मदत होईल. म्हणून केंद्र सरकारकडून या संदर्भात येता शेती हंगाम सुरू होण्यापूर्वी सत्वर कार्यवाहीची अपेक्षा ठेवीत आहोत.

१२. नवीन तंत्रज्ञानावर आधारलेल्या १७ सहकारी सूतगिरण्या स्थापन करण्यासाठी सहाय्य करण्याचे शासनाने ठरवले आहे.

१३. यावर्षी १३१ आश्रमशाळांना मंजुरी दिल्याने राज्यातील आश्रमशाळांची एकूण संख्या ५२२ झाली आहे. यामुळे आदिवासींच्या शैक्षणिक कार्यक्रमास जोरदार

चालना मिळाली आहे. सुमारे १.२० लाख विद्यार्थ्यांना या शाळांमधून शिक्षणाचा लाभ मिळत आहे. त्याखेरीज, धुळे व अहमदनगर जिल्ह्यांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून आदिवासींसाठी नवोदय विद्यालयांच्या धर्तीवर २ आदर्श आश्रमशाळा सुरू करण्याचेदेखील शासनाने ठरवले आहे.

१४. शासनाने असा निर्णय घेतला आहे की, जर मागणी असेल आणि सोयीस्कर अशी जागा उपलब्ध असेल तर प्रत्येक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये निदान एक तरी उपसा सिंचन योजना शासनाच्या खर्चाने हाती घेण्यात यावी.

१५. आदिवासींच्या सोयीसाठी सुमारे ५,००० लोकसंख्येसाठी एक आदिवासी सेवा सहकारी संस्था असावी यादृष्टीने अशा विद्यमान संस्थांची पुनर्रचना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१६. मागासवर्गीयांच्या गृहनिर्माण योजनांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने कर्ज व अर्थसहाय्य यांची मानके शिथिल करण्यात आली आहेत.

१७. माझ्या शासनाने, ज्यांचे संपूर्ण कुटुंब वर्षातील सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ आपल्या शेळ्या व मेंढ्या यांच्या चराईसाठी गावोगाव फिरत असते अशा धनगर व त्यांच्या अहिर, डांगे, गटरी, हंडे, तेलवर, हटकर, हाटकर, खुटेकर, कानडे, कुरमार, लाडसे, सनगर, धनवर, शेगर, तेलंगी, तेल्लारी, कोकणी-धनगर, वऱ्हाडे-धनगर, झाडे, झेंडे आणि माहुरे या पोटजाती शासनाकडून भटक्या जमातींना मिळणाऱ्या सवलती मिळण्यास पात्र ठराव्यात म्हणून त्यांचा समावेश भटक्या जमातींमध्ये करण्याचा निर्णय घेतला आहे.

१८. समाजाच्या दुर्बल आणि वंचित घटकांना लाभ देण्यासाठी शासनाने स्वयंसेवी संघटनांच्या मदतीने मुंबईत विशेष कल्याण केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

१९. मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देण्यासंबंधातील योजनेच्या अटी शासनाने शिथिल केल्या असून मराठी नाट्यपरिषदेला नाट्य संकुलाच्या उभारणी-साठी ५१ लाख रुपये मंजूर केले आहेत.

२०. या वर्षामध्ये ६०,००० शेती पंपांना वीजपुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे वीजपुरवठा करण्यात आलेल्या पंपांची एकूण संख्या १४.५५ लाख एवढी झाली आहे. ही संख्या देशातील कोणत्याही राज्यापेक्षा अधिक आहे.

२१. राज्यातील आर्थिक विकासाच्या दृष्टीने वीजपुरवठ्यास किती महत्त्वाचे स्थान आहे हे सन्माननीय सदस्यांना माहीतच आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन माझ्या शासनाने वीज क्षेत्रावरील खर्चात भरीव वाढ करण्याचा आणि पुढील वर्षी योजनांतर्गत खर्चाच्या ३० टक्के रक्कम या क्षेत्राकरता राखून ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

२२. दुग्धव्यवसायाच्या कार्यक्षेत्रात राज्याने यावर्षी उच्चांक गाठला असून या काळात दररोज सरासरी २६.६३ लाख लिटर दूध गोळा करण्यात आले. रायपूर, दिल्ली, कलकत्ता व मडगाव अशा इतर राज्यांतील काही शहरांना नियमितपणे दुधाचा पुरवठा करण्यात राज्याला प्रथमच यश मिळाले आहे.

२३. कुक्कुटपालनास प्रोत्साहन देण्यासंबंधात माझ्या शासनाने गेल्या वर्षी घोषित केलेल्या निर्णयाला चांगला प्रतिसाद मिळाला असून २९ कुक्कुटपालन सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत आणि राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडे आणखी ५२ संस्थांची वित्तीय सहाय्यासाठी शिफारस करण्यात आली आहे.

२४. प्रतिवर्षी ५ कोटी मत्स्यबीजांचे उत्पादन करण्याची संभाव्य क्षमता असलेली पाच चिनी पद्धतीची उबवणी केंद्रे उभारण्याचा एक प्रभावी कार्यक्रम यावर्षी हाती घेण्यात आला आहे.

२५. उद्योगांना एकत्रित प्रोत्साहन देण्याच्या १९८८ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या योजनेला उद्योजकांकडून उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला आहे. उद्योगधंद्यांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा विस्तारित कार्यक्रम राबवण्यासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ७५ लघु औद्योगिक क्षेत्रांत आणि ५५ औद्योगिक विकास केंद्रांच्या ठिकाणी जमीन संपादन करण्याची कार्यवाही सुरू केली आहे. याशिवाय, एका केंद्र पुरस्कृत योजनेखाली अधिकाधिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणारी सहा विकास केंद्रेदेखील राज्याच्या विविध विभागां-मध्ये उभारण्यात येणार आहेत.

२६. कामगारांच्या सहकारी संस्थांमार्फत आजारी उद्योगधंद्यांचे पुनरुज्जीवन करण्याच्या अभिनव प्रयोगाला पाठिंबा म्हणून माझ्या शासनाने कमानी टयूब्ज लिमिटेड या कंपनीच्या बाबतीत सहाय्य केले आहे व औद्योगिक वित्तीय पुनर्रचना मंडळासमोर (B.I.F.R.) विचारार्थ येणाऱ्या आजारी उद्योगधंद्यांच्या प्रकरणी सहाय्य देण्यासंबंधातील मानकांच्या बाबतीत राज्य शासनाने उदार दृष्टिकोन ठेवला आहे.

२७. कोकणात सुरू होणाऱ्या तीन स्पंज आयर्न प्रकल्पांसाठी राज्य शासनाच्या अविरत प्रयत्नांमुळे गॅस पुरविण्यास भारत सरकारने मान्यता दिली आहे. यामुळे तदनुषंगिक उद्योगांमध्ये रोजगारांच्या अनेक संधी निर्माण होतील व राज्यातील पोलाद उत्पादनासही मोठी चालना मिळेल. राज्यातील औद्योगिक व इतर प्रकल्पांसाठी अधि-काधिक प्रमाणात नैसर्गिक वायू मिळविण्याचे राज्य शासनाचे प्रयत्न चालूच आहेत.

२८. एक रोजगाराभिमुख उत्पादक कार्यक्रम म्हणून रेशीम उद्योगाला राज्य शासन प्रोत्साहन देत आले आहे. या वर्षात राज्याच्या विविध भागांमधील १,२०० हेक्टर जमीन तुतीच्या लागवडीखाली आणण्यात आली आहे.

२९. महाराष्ट्रात सहकार क्षेत्रातील २४ नव्या साखर कारखान्यांना भारत सरकारने इरादापत्रे दिलेली आहेत हे सांगताना मला आनंद होत आहे. या कारखान्यांपैकी १३ कारखाने मराठवाडा आणि विदर्भातील मागास भागात आहेत.

३०. एकाधिकार कापूस खरेदी योजनेनुसार महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक महासंघाने जानेवारी १९९० पर्यंत ६० लाख क्विंटल कापूस खरेदी केला असून चालू हंगामात आणखी ३० लाख क्विंटल कापसाची खरेदी होईल अशी अपेक्षा आहे. भारत सरकारने निश्चित केलेल्या आधार किंमतीपेक्षा २० टक्के आगाऊ बोनस हंगामाच्या सुरुवातीपासूनच देण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे.

३१. या वर्षात राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील परस्पर संबंधात उल्लेखनीय सुधारणा झाल्याचे दिसून येते. १९८८ मध्ये ६४.८३ लाख श्रम-दिवस वाया गेले होते तर, १९८९ मध्ये फक्त ३६.७० लाख श्रम-दिवस वाया गेले. शासनाने वरिष्ठ पातळीवरून केलेल्या अविरत प्रयत्नांमुळे हिंदुस्थान लिव्हर लिमिटेड यांच्या शिवडी येथील कारखान्यात आणि टेल्को लिमिटेड यांच्या पिंपरी-चिंचवड येथील कारखान्यात औद्योगिक शांतता पुन्हा प्रस्थापित झाली आहे व त्यामुळे फार मोठा कामगारवर्ग व त्यांचे कुटुंबीय यांच्यावरील आपत्तींचे निवारण झाले आहे, हे सांगताना मला आनंद होत आहे.

३२. १९८९–९० या वर्षामध्येसुद्धा नागरी पाणीपुरवठ्यावर भर देण्यात आला. यावर्षी पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण यांच्या ६४ योजनांचे काम सुरू आहे. या योजनांपैकी शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील जालना-अंबड, नाशिक आणि नांदेड या योजना आणि न्हावा-शेवा पाणीपुरवठा प्रकल्प (दुसरा टप्पा) यापूर्वीच कार्यान्वित झालेला आहे. पुढील वर्षामध्ये आणखी २१ योजनांचे काम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. या वर्षामध्ये नागपूर (पेंच टप्पा-दोन) या योजनेसह १० नवीन पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आल्या आहेत.

३३. राज्यामध्ये नागरीकरण झपाट्याने होत आहे त्यामुळे आपल्या नगरांमधील आणि शहरांमधील विद्यमान पायाभूत सोयी व सुविधांवर अतिशय ताण पडत आहे. हे आव्हान पेलण्यासाठी, माझ्या शासनाने कमी खर्चाचे स्वच्छता कार्यक्रम, पर्यावरण सुधारणा, नागरी भागातील सामाजिक वनीकरण आणि शहरातील दारिद्र्य कमी करणे यासंबंधात नव्या जोमाने पुढाकार घेतला आहे.

३४. उच्च माध्यमिक टप्प्यावरील शिक्षण अधिकाधिक व्यवसायाभिमुख करण्याच्या उद्देशाने माझ्या शासनाने आणखी १५० शिक्षण संस्थांमध्ये किमान क्षमता पाठ्यक्रम सुरू केले आहेत. त्याचप्रमाणे, राज्याच्या निरनिराळ्या भागांमध्ये सात नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आल्या आहेत.

३५. या वर्षामध्ये यवतमाळ आणि धुळे येथे दोन शासकीय वैद्यक महाविद्यालये सुरू करण्याबरोबरच खाजगी संस्थांना "विना अनुदान तत्त्वावर" ७ ॲलोपॅथी, १० आयुर्वेद, ८ दंत आणि ४ होमिओपॅथी वैद्यक महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी देण्यात आली आहे. यामुळे सुमारे २,००० विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध होतील आणि राज्यातील रुग्णालयांत सुमारे ७,००० जादा खाटांची सोय उपलब्ध होईल.

३६. राज्य क्षेत्रातील पाटबंधारे प्रकल्पांद्वारे जून १९८९ अखेरपर्यंत राज्यात एकूण २५.५ लाख हेक्टर्स इतकी संभाव्य सिंचनक्षमता साध्य करण्यात आली आणि ती जून १९९० पर्यंत आणखी ६८,००० हेक्टर्सनी वाढेल अशी अपेक्षा आहे.

३७. पाटबंधारेविषयक कामांच्या अंमलबजावणीत लाभधारकांना सहभागी होण्यास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने शासनाने सहकारी साखर कारखान्यांना आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची कामे हाती घेण्यास प्रोत्साहन दिले आहे. मला हे सांगताना आनंद होत आहे की अनेक साखर कारखान्यांकडून या योजनेस अनुकूल प्रतिसाद मिळत आहे.

३८. मराठवाड्याचा झपाट्याने विकास व्हावा म्हणून राज्य शासन या भागातील मीटर गेज रेल्वे मार्ग रुंद करण्याच्या कामासाठी येणाऱ्या खर्चात कर्जरोखे विक्रीस काढून सहभागी होण्याबाबतच्या आपल्या प्रस्तावाचा भारत सरकारकडे नेटाने पाठपुरावा करील. कोकण रेल्वेसाठी जमीन विनामूल्य देण्यासंबंधात माझ्या शासनाने यापूर्वी दिलेल्या आश्वासनाची निश्चितच पूर्तता करण्यात येईल. कोकण रेल्वेचे काम रोह्याच्या पुढे नेण्याचेदेखील प्रयत्न चालू आहेत.

३९. राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांनसार, गावे हमरस्त्यांना जोडण्याची योजना शासन राबवीत आहे. या वर्षाअखेर १,५०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली १०० टक्के गावे हमरस्त्यांशी जोडली जातील अशी अपेक्षा आहे. हमरस्त्यांशी गावे जोडण्याच्या संबंधात १,००० ते १,५०० या दरम्यान लोकसंख्या असलेल्या गावांच्या बाबतीत, राष्ट्रीय लक्ष्य ५० टक्के इतके असताना राज्याने त्याबाबतीत ८२ टक्के इतके लक्ष्य साध्य केले आहे.

४०. झोपडपट्टीवासीयांविषयी आम्हाला काळजी व आस्था वाटते म्हणून यावर्षी आणखी सात लाख झोपडपट्टीवासीयांसाठी मूलभूत सोयींची तरतूद करुन गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमात खूपच वाढ केली आहे.

४१. कोकणच्या पश्चिम किनारपट्टीवरील ३३ ठिकाणांचा पर्यटन स्थळे म्हणून विकास करण्याचा एक विशेष कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

या प्रयोजनासाठी, निवासेतर भारतीयांसह, उद्योजकांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत जमीन उपलब्ध करून देण्यात येईल.

४२. शासनाने या आधीच कांदिवली येथे राज्यातील पहिले क्रीडा वसतिगृह सुरू केलेले आहे. तसेच पुणे येथे एक आधुनिक क्रीडा संकुल विकसित करण्याचाही शासनाचा विचार आहे.

४३. राज्यात विकासाच्या क्षेत्रात झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे येणारी पर्यावरणविषयक दायित्वे आणि संतुलित विकासाची गरज याची माझ्या शासनाला तीव्र जाणीव आहे. या अनुषंगाने जल (प्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ यामध्ये संसदेने केलेल्या दूरगामी सुधारणा राज्याने स्वीकारल्या आहेत.

४४. राज्यातील माजी सैनिकांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी यावर्षी राज्य शासनाने अनेक उपाय योजले आहेत. माजी सैनिकांचे कल्याण हा विषय एका कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याकडे विशेषेकरून सोपवण्यात आला आहे. दुसऱ्या महायुद्धात कामगिरी बजावलेल्या ज्या वयोवृद्ध माजी सैनिकांना केंद्र शासनाकडून कोणतेही निवृत्तिवेतन मिळत नाही त्यांना दरमहा ३०० रुपये इतके निवृत्तिवेतन देण्याची एक योजना शासनाने मंजूर केली आहे. माजी सैनिकांना केंद्र शासनाकडून ज्या सवलती दिल्या जातात त्याच धर्तीवर त्यांना सवलती देण्याच्या दृष्टीने, राज्य शासनाच्या सेवेत नोकरी करू इच्छिणाऱ्या माजी सैनिकांच्या बाबतीत शैक्षणिक अर्हता शिथिल करण्यात येत आहेत.

४५. पोलीस पाटलांचे मानधन दरमहा ७५ रुपयांवरून ३०० रुपयांपर्यंत वाढविण्यात आले आहे. कोतवालांचे मानधन दुपटीपेक्षा अधिक झाले असून ते ऑक्टोबर १९८९ पासून दरमहा ६०० रुपये इतके निश्चित करण्यात आले आहे आणि त्यात मार्च १९९० आणि मार्च १९९१ मध्ये आणखी वाढ करण्यात येईल.

४६. गेल्यावर्षी प्रशासन सतत दक्ष राहिल्यामुळे कायदा व सुव्यवस्थाविषयक परिस्थिती पूर्णपणे समाधानकारक राहिली. गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील नक्षल विरोधी कृति कार्यक्रम आणखी मजबूत करण्यात आला असून या कार्यक्रमास आता गती प्राप्त झाली आहे.

४७. जनतेला न्यायदानाच्या सोयी जवळच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने सर्व तालुक्यांच्या ठिकाणी त्या उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने आणखी ४४ तालुक्यांच्या ठिकाणी न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी यापैकी २३ न्यायालये याआधीच स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच १२ तालुक्यांच्या ठिकाणी अपील अधिकारिता व दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांची न्यायालयेदेखील स्थापन करण्यात आली आहेत.

४८. जकात कर रद्द करून त्याऐवजी प्रवेश कर आकारण्याची तरतूद करण्याकरता यथायोग्य असा कायदा करण्याचा प्रस्ताव माझ्या शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबतीतले कोणतेही विधेयक राज्य विधानमंडळापुढे मांडण्यापूर्वी त्याला माननीय राष्ट्रपतींची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक असते. या विषयावर व्यापारी आणि स्थानिक प्राधिकरणांसह जनतेमधील विविध घटकांनी परस्परविरोधी दृष्टिकोन व्यक्त केले आहेत. याबाबतीत आणखी वेळ न घालवता प्रभावी कायदा करणे शक्य व्हावे यासाठी जनमत अजमावण्याकरिता अशा कायद्याची प्रस्तावात्मक निवेदने प्रसृत करण्याचा माझ्या शासनाचा विचार आहे.

४९. विविध शासकीय विभाग, निमशासकीय संस्था व यंत्रणा यांमधील मंजूर रिक्त पदे भरण्यात न आल्यामुळे त्यांना आपली वाढती कामे पार पाडणे कठीण जात आहे. म्हणून शून्याधारित अर्थसंकल्पन आणि विकासाधारित अर्थसंकल्पन यानुसार थेट भरतीवर घालण्यात आलेली बंदी उठवून अशी रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

५०. गेली अनेक वर्षे ज्यावर तोडगा निघू शकलेला नाही त्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाविषयी महाराष्ट्राच्या जनतेच्या भावना किती तीव्र आहेत याची मला जाणीव आहे. लोकशाही तत्त्वांच्या आधारे ही समस्या सोडवण्याच्या दृष्टीने माझ्या शासनाने विवादग्रस्त भागात जनमताचा कौल घेण्याची सूचना केलेली आहे. जरी भारत सरकारने या प्रस्तावास अनुकूल प्रतिसाद दिलेला असला तरी याबाबतीत विशेष अशी प्रगती झालेली नाही. या भागात नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीच्या निकालांवरून स्पष्ट कल्पना येते की, तेथील बहुसंख्य जनतेने या भागाचे महाराष्ट्रात विलीनीकरण होण्याच्या बाजूने कौल दिला आहे. या प्रश्नासंदर्भात सीमा भागातील जनतेच्या तीव्र भावना व लोकशाही मार्गाने वेळोवेळी व्यक्त झालेला कौल लक्षात घेऊन केंद्र सरकारने विनाविलंब हा प्रश्न सोडवून सीमावासीयांना न्याय द्यावा.

५१. सन्माननीय सदस्यहो, या अधिवेशनात आपल्याला संसदेने अलिकडेच संमत केलेल्या संविधानातील ६२व्या सुधारणेसंबंधातील विधेयकाचे अनुसमर्थन व तसेच आपल्यासमोर ठेवण्यात येतील अशी विवक्षित अध्यादेशांचे अधिनियमात रूपांतर करणारी विधेयके आणि शासनाचे तातडीच्या स्वरूपाचे अन्य कामकाज यांवर विचार करावयाचा आहे.

आपल्या चर्चा-विमर्शात मी आपणांस सुयश चिंतितो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!